**पुणे विदयापीठ**

एम. आय. सी.

फोन नंबर २५६०१२३४

संदर्भ क्र. दिनांक: ०७.०२.२०१२

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व महाविद्यालये बीए., बी कॉम.,
बी एस्सी., बीबीए, बीसीए, बी.बी.एम. (आय.सी.)

विषय – एफ.वाय.बीए., बी कॉम.,बी एस्सी., बीबीए, बीसीए, बी.बी.एम. (आय.बी.) परिक्षेच्या निकालाच्या कामकाजासाठी एक समान संगणक प्रणाली बाबत

महोदय/महोदया,

पुणे विदयापीठाने सर्व महाविदयालयातील वरील परीक्षांसाठी एकसमान संगणक प्रणाली M/s Hindustan Computer, मालेगाव, नाशिक यांच्यातर्फे घेण्याचे ठरविले आहे.

सदर संगणक प्रणाली विदयापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होणार असून महाविदयालयांनी सदर संगणक प्रणाली संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावी.

संबंधित संगणक प्रणालीच्या कामकाजासाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करणार आहे. कार्यशाळेचा कालावधी एक दिवसाचा असून त्याचे वेळापत्रक नंतर जाहिर करण्यात येईल.

वरील कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील परीक्षेच्या कामकाजाशी संबधित एक शिक्षकेतर व एक शिक्षक सेवक असे दोन सेवक कर्मचारी उपलब्ध करून दयावेत. तसेच सर्व प्राचार्यांनी सदर कार्यशाळेत सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सदर संगणक प्रणालीच्या माध्यमातूनच एस.वाय.,टि.वाय.ॲडमिशन/ परीक्षा फॉर्मची डेटा एन्ट्री करावी. व त्यानंतर सर्व डेटा विदयापीठाला उपलब्ध करून दयावा.

सदर सॉफ्टवेअर विद्यापीठाच्या <link> वर उपलब्ध करून दिले जाईल. सॉफ्टवेअर सुरू करण्याकरीता लागणारी key कार्यशाळेत दिली जाईल. सॉफ्टवेअरची key घेतल्याशिवाय सदर सॉफ्टवेअर सुरू होणार नाही याची दखल घ्यावी. सॉफ्टवेअर संबंधी कोणत्याही प्रश्नांचे समाधान करण्यासाठी Support line number (02554) 252401/252403/251562 वर संपर्क साधावा.

सदर संगणक प्रणालीसाठी Online Support/Email Support/Internet Support इत्यादी M/s Hindustan Computer मोफत देणार आहे. या व्यतीरिक्त कोणत्याही महाविदयालयास प्रत्यक्षात अधिक मदत हवी असल्यास त्यासाठी संबंधीत महाविद्यालयांने M/s Hindustan Computer यांना रुपये ४०००/— वार्षिक देखभाल खर्च द्यावा लागेल.

तरी याबाबत नेहमीप्रमाणे सर्व महाविद्यालयांनी सहकार्य करावे हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.शि.मो.आहिरे)
परीक्षा नियंत्रक